https://t.me/mpscofficers

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# वस्तू व सेवा कर

## एक दृष्टीक्षेप

www.reliableacademy.com 9222333999

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

join us on telegram at @mpscofficers

https://t.me/mpscofficers

www.reliableacademy.com 9222333999

join us on telegram at @mpscofficers

https://t.me/mpscofficers

# वस्तू व सेवा कर

## एक दृष्टीक्षेप

सत्यमेव जयते

वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

join us on telegram at @mpscofficers

www.reliableacademy.com 9222333999

www.reliableacademy.com 9222333999

https://t.me/mpscofficers

देवेंद्र फडणवीस
मुख्य मंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय
मुंबई-४०० ०३२

५ मे २०१७

# शुभेच्छा

देशात वस्तू व सेवा कर प्रणालीची (जीएसटी) अंमलबजावणी होत आहे. "एक देश एक कर" हे उद्दिष्ट लक्षात घेऊन करण्यात आलेला स्वातंत्र्योत्तर काळातील अप्रत्यक्ष कर प्रणालीमधील हा सर्वात महत्त्वाचा बदल आहे. केंद्र शासन आणि सर्व राज्य शासनांनी समान विचाराने राष्ट्रीय सकल उत्पन्नात वृद्धी करणाऱ्या कर पद्धतीची अंमलबजावणी करण्याचा निर्णय सर्वसंमतीने घेतला आहे.

संपूर्ण देशात अप्रत्यक्ष कराची एकच पारदर्शक पद्धत हा वस्तू व सेवा कर प्रणालीचा मूळ गाभा आहे. उद्योजक आणि व्यापाऱ्यांसाठी सोपी करपद्धत यामुळे अंमलात येणार असून त्यातील तरतुदींमुळे वस्तू व सेवांच्या किंमतीत घट होऊन ग्राहकास त्याचा फायदा होईल.

करप्रणालीशी संबंधित सर्व घटकांना वस्तू व सेवा कर प्रणालीची माहिती देणारी ही पुस्तिका सर्वांना निश्चितच उपयुक्त ठरेल, असा विश्वास वाटतो.

(देवेंद्र फडणवीस)

दूरध्वनी : ०२२-२२०२ ५१५१/२२०२ ५२२२, फॅक्स : ०२२-२२०२ ९२१४
ई-मेल : cm@maharashtra.gov.in, वेब साईट : www.maharashtra.gov.in

www.reliableacademy.com 9922233999

join us on telegram at @mpscofficers

https://t.me/mpscofficers

मंत्री
महाराष्ट्र राज्य

**मंत्री**
**वित्त आणि नियोजन, वने**
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

दिनांक : ५ मे, २०१७

एकसंघ बाजारपेठ निर्माण करुन व्यापार तसेच उद्योगास चालना देणारी वस्तू व सेवा कर प्रणाली अंगीकृत करण्याचा निर्णय संपूर्ण देशाने सहमतीने घेतला आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात अप्रत्यक्ष कर प्रणालीतील या महत्वपूर्ण बदलामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर दूरगामी सकारात्मक बदल होणार आहे. कर अनुपालनाच्या सहजतेमुळे वस्तू व सेवांच्या किंमतीत घट होईल व सर्वसामान्य उपभोक्त्यांस त्याचा लाभ होईल.

प्रत्येक राज्यात अप्रत्यक्ष कराची वेगवेगळी पध्दत व्यापाऱ्यास अडथळा निर्माण करणारी होती त्याऐवजी समान पध्दतीचा अवलंब व्यापारामध्ये वृध्दी देणारा ठरणार असल्यामुळे राष्ट्रास अपेक्षित आर्थिक वृध्दीच्या दराचे उद्दिष्ट गाठण्यास यश येईल.

वस्तू व सेवा कर प्रणालीच्या अवलंबनाकरिता राज्याने संपूर्ण तयारी केली आहे. कर प्रणालीची माहिती सर्वांना व्हावी याकरिता या पुस्तिकेची विशेषत्वाने मदत होईल याची मला खात्री आहे.

(सुधीर मुनगंटीवार)

www.reliableacademy.com 9222333999

join us on telegram at @mpscofficers

https://t.me/mpscofficers

राज्यमंत्री
गृह (ग्रामीण), वित्त, नियोजन
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
www.maharashtra.gov.in

दिनांक ५ मे, २०१७

अस्तित्वातील अप्रत्यक्ष कराऐवजी वस्तू व सेवा कर या एकच करपध्दतीच्या अवलंबनाचा निर्णय केंद्र व राज्य शासन यांनी सर्वसंमतीने घेतला व देशाच्या आर्थिक प्रगतीस वृध्दी देणाऱ्या करप्रणालीकरिता देश तयार झाला आहे.

व्यापार व उद्योगाच्या अनुपालनास सहज, सोपी असलेल्या करपध्दतीमध्ये करावरील कर नसल्याने वस्तू व सेवांच्या किमतीत घट होवून ग्राहकांना त्याचा फायदा होईल.

संपूर्ण देशाची एकच बाजारपेठ निर्माण होण्यास या पध्दतीचे उद्दिष्ट नक्कीच साध्य होईल यात शंका नाही.

वस्तू व सेवा कर प्रणालीची तपशीलवार माहिती देणारी पुस्तिका करप्रणालीच्या सर्व घटकांना उपयुक्त ठरेल याची मला खात्री आहे.

(दिपक केसरकर)

www.reliableacademy.com 9222333999

join us on telegram at @mpscofficers

www.reliableacademy.com 9222333999

https://t.me/mpscofficers

# वस्तू व सेवा कर – एक दृष्टीक्षेप

## १. पार्श्वभूमी :–

१.१ संपूर्ण देशामध्ये अप्रत्यक्ष कराच्या एकसमान पद्धतीकरिता जीएसटी (Goods and Service Tax) प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय केंद्र शासन व राज्य शासन यांच्या चर्चेअंती घेण्यात आला. जीएसटी च्या अवलंबनाकरिता संविधानात बदल करावयाची आवश्यकता होती. त्यानुसार संविधानात बदल करण्याबाबतचे विधेयक लोकसभेत मांडण्यात आले व लोकसभेने संविधान (एकशे बावीसावी सुधारणा) विधेयक, २०१४ दिनांक ६ मे २०१५ रोजी पारीत केले. लोकसभेने पारीत केलेले विधेयक संमतीकरिता राज्यसभेकडे पाठविण्यात आले. राज्यसभेने काही बदलासह उल्लेखित विधेयक दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी पारीत केले व बदलासह विधेयक लोकसभेकडे पाठविण्यात आले. राज्यसभेने सुचविलेले बदल लोकसभेने दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी स्वीकृत केले व संविधान सुधारणा विधेयक पारीत करण्यात आले. लोकसभा व राज्यसभेने पारीत केलेल्या संविधान (एकशे बावीसावी सुधारणा) विधेयक, २०१४ ला संविधानाच्या अनुच्छेद ३६८ (२) खालील परंतुकानुसार कायद्यात रूपांतर करण्याकरिता आवश्यकतेपेक्षा जास्त राज्यांच्या विधीमंडळाने अनुसमर्थन (ratification) दिले. त्यानुसार संसदेने पारीत केलेल्या संविधान (एकशे बावीसावी सुधारणा) विधेयक, २०१४ ला महामहीम राष्ट्रपती यांनी दिनांक ८ सप्टेंबर २०१६ रोजी संमती दिल्यानंतर संविधान (एकशे एक सुधारणा) कायदा, २०१६ अस्तित्वात आला आहे.

## २. जीएसटी करप्रणालीबाबतची माहिती संक्षिप्त स्वरुपात देण्यात येत आहे:–

### २.१ जीएसटी (GST) प्रणालीची आवश्यकता

सद्यपरिस्थितीत अप्रत्यक्ष करप्रणालीमध्ये करावर कराची आकारणी केली जाते. उदा. केंद्र शासनाव्दारे उत्पादित वस्तूंवर लावण्यात येणाऱ्या केंद्रीय उत्पादन शुल्कावर (Central Excise) विक्रीकराची आकारणी होते. यालाच करावर कर म्हणजेच कॅसकेडींग ऑफ टॅक्स (Cascading of Tax) असे म्हणतात. मूल्यवर्धित कराचा महाराष्ट्र राज्य शासनाने दिनांक १ एप्रिल २००५ रोजी अवलंब केला. मुल्यवर्धित करप्रणालीचा पुढील भाग म्हणजे सर्व अप्रत्यक्ष करासंदर्भात एकत्रित करपद्धतीचा अवलंब करणे आहे. अप्रत्यक्ष कर केंद्र शासन आणि राज्य शासनाद्वारे लावले जातात, आणि यामध्ये सद्यपरिस्थितीत खालीलप्रमाणे त्रुटी आहेत व त्या त्रुटी जीएसटी करप्रणालीद्वारे दुरुस्त होणार आहेत:–

- मुल्यवर्धित कर (VAT) राज्य शासनामार्फत व उत्पादन शुल्क, सेवाकर (Service Tax) हे केंद्र शासनामार्फत आकारले जातात. सदर कराची आकारणी राज्य व केंद्र शासनामार्फत स्वतंत्रपणे होत असल्याने एका कराची वजावट (credit) दुसरा कर भरताना दिली जात नाही.

- सद्यस्थितीमध्ये उत्पादित मालावर केंद्रीय उत्पादन शुल्क लागू होते व त्यावर मूल्यवर्धित कर

join us on telegram at @mpscofficers

आकारला जातो. त्यामुळे करावर कराची आकारणी होवून कराचा बोजा वाढतो. जीएसटीमध्ये करावर कर नाहीसा होणार असल्याने कराचा बोजा कमी होईल.

- सद्यपरिस्थितीत केंद्रीय विक्रीकर कायदा अस्तित्वात आहे. या कायद्यानुसार आंतरराज्यीय माल विक्रीवर ज्या राज्यातून मालाची विक्री झाली त्या राज्यांतून २% केंद्रीय विक्रीकर लावला जातो. परंतु ज्या राज्यामध्ये वस्तूंची खरेदी झाली आहे त्या राज्यामध्ये आकारण्यात आलेला केंद्रीय विक्री कराची वजावट मिळत नाही. कराची वजावट मिळत नसल्यामुळे कराचा भाग मूळ किंमतीत मिळून किंमत वाढते. जीएसटीअंतर्गत केंद्रीय विक्रीकर कायदा जीएसटी च्या बाहेर असणाऱ्या सहा वस्तूं व्यतिरिक्त निरसीत केला जाईल.

## २.२ जीएसटी (GST) करप्रणालीचे स्वरुप व सर्वसाधारण फायदे

जीएसटी म्हणजे वस्तूच्या आणि सेवेच्या पुरवठ्यावर कर लावण्याची पद्धत आहे. या पद्धतीमध्ये मालाच्या उत्पादनापासून शेवटच्या विक्रेत्यापर्यंत होणाऱ्या पुरवठ्यांच्या मूल्यवर्धनावर कर लावण्यात येतो. त्याचप्रमाणे सेवा देणाऱ्यावर सेवेच्या किंमतीवर कर आकारणी होते. या प्रक्रियेत कर लावताना वस्तू व सेवा प्राप्त करताना भरलेल्या कराची पूर्ण वजावट देण्यात येते. जीएसटी चे सर्वसाधारण फायदे खालीलप्रमाणे आहेत.

(i) केंद्र व राज्य शासनाचे बहुतांश अप्रत्यक्ष कर एकत्र आल्याने करप्रणाली सोपी व सुटसुटीत होईल.

(ii) व्यापारी व उद्योगधंद्यास हिशेब ठेवणे सोपे होईल कारण अनेक कर कायद्यांऐवजी एकच कर कायदा लागू होईल.

(iii) करावर कर लागत नसल्याने वस्तूंच्या किंमतीत घट होवून ग्राहकांना फायदा होईल.

(iv) देशभर एकच प्रणाली अंगीकृत झाल्याने संपूर्ण देश एकसंघ बाजारपेठ (Common Market) होईल.

(v) कररचना पारदर्शी असेल.

(vi) संगणक प्रणालीचा जास्त वापर असल्याने व्यापाऱ्यांना सुविधा होईल.

## २.३ जीएसटी (GST) अंतर्गत येणारे अप्रत्यक्ष कर

केंद्र आणि राज्य शासनाचे वस्तू आणि सेवा संबंधित अप्रत्यक्ष कर एकत्रित केले जातील. केंद्रीय उत्पादन शुल्क (Central Excise Duty), अतिरिक्त उत्पादन शुल्क (Additional Duty of Excise), सेवाकर (Service Tax), अतिरिक्त सीमाशुल्क (Additional Duty of Custom i.e. CVD), विशेष अतिरिक्त सीमाशुल्क (SAD), अधिभार आणि सेस केंद्र शासनाचे अप्रत्यक्ष कर आहेत. तर मूल्यवर्धित कर (VAT), केंद्रीय विक्रीकर (CST), करमणूक कर, ऐषआराम कर, लॉटरी कर, ऊस खरेदी कर, प्रवेश कर, स्थानिक संस्था कर, जकात हे राज्य शासनाचे

www.reliableacademy.com 9222553999

अप्रत्यक्ष कर आहेत. हे सर्व कर जीएसटीमध्ये अंतर्भूत करण्यात येतील. सध्याची कर प्रणाली आकृति क्र. १ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**आकृती क्र. १** **सध्याची कर प्रणाली**

**केंद्रीय कर**

- केंद्रीय उत्पादन शुल्क
- अतिरिक्त उत्पादन शुल्क (विशेष महत्वाच्या वस्तू)
- उत्पादन शुल्क (औषधी आणि प्रसाधन सामुग्री)
- अतिरिक्त उत्पादन शुल्क (कापड व कापड उत्पादने)
- अतिरिक्त सीमा शुल्क (CVD)
- विशेष अतिरिक्त सीमा शुल्क (SAD)
- सेवा कर
- वस्तू व सेवांच्या पुरवठ्याशी संबंधित असलेला केंद्रीय अधिभार आणि उपकर

**जीएसटी**

**राज्यातील कर**

- राज्य मूल्यवर्धित कर
- केंद्रीय विक्रीकर
- ऐषआराम कर
- प्रवेश कर (ऑक्ट्रॉय, एलबीटी, वाहनांवरील प्रवेश कर, वस्तूंवरील प्रवेश कर इत्यादी)
- करमणूक आणि मनोरंजन कर (स्थानिक संस्थांकडून आकारलेल्या शिवाय)
- जाहिरातीवरील कर (Advertisement Tax)
- खरेदीकर
- वनविकास कर (वन उपजांच्या विक्रीवरील कर)
- लॉटरी, बेटींग आणि जुगारावरील कर
- वस्तू व सेवांच्या पुरवठ्याशी संबंधित असलेला राज्य अधिभार आणि उपकर

## २.५ जीएसटी (GST) अंतर्गत वस्तू व सेवांवर कर लावण्याची पद्धत

जीएसटी मध्ये वस्तू व सेवेच्या प्रत्येक पुरवठा व्यवहारांवर (करमाफ वस्तू व सेवा व्यतिरिक्त) दोन कर लावण्यात येतील. एक कर केंद्र शासनामार्फत लावण्यात येईल व त्यास केंद्रीय वस्तू व सेवा कर (CGST) असे नामकरण असेल व दुसरा कर राज्य शासनामार्फत लावण्यात येईल व त्यास राज्य वस्तू व सेवा कर (SGST) असे नामकरण असेल. तसेच आंतरराज्य वस्तू व सेवांच्या पुरवठ्यावर तसेच आयातीवर सुद्धा केंद्र शासनामार्फत एकात्मिक वस्तू व सेवा कर (Integrated GST - IGST) लावण्यात येईल. CGST Act, IGST Act, संघराज्य वस्तू व सेवा कर (UTGST Act) व Goods & Services Tax (Compensation to States) Act (राज्यांचा जर कर महसूल कमी झाला तर त्याची नुकसान भरपाई केंद्रामार्फत या कायद्याद्वारे केली जाईल.) इत्यादी कायदे संसदेमार्फत पारीत करण्यात आले आहेत. SGST कर कायदा (महाराष्ट्र जीएसटी कायदा) राज्य विधीमंडळामार्फत पारीत करणे आवश्यक आहे. सीजीएसटी, एसजीएसटी व आयजीएसटी मध्ये अंतर्भूत होणारे कर आकृती क्र. २ मध्ये दर्शविण्यात आले आहेत.

www.reliableacademy.com 9822233999

आकृती क्र. २ जीएसटीमध्ये अंतर्भूत कर




## २.६ जीएसटी (GST) कार्यक्षेत्राबाहेरील वस्तू

जीएसटी करप्रणालीत सर्व वस्तू आणि सेवांवर कर लावण्याचे प्रयोजन आहे. मात्र मद्याचा समावेश वस्तू व सेवा करप्रणालीमध्ये करण्यात येणार नाही. तसेच कच्चे तेल (Petroleum Crude), डिझेल, पेट्रोल, नॅचरल गॅस, विमानाचे इंधन यांचा जीएसटीमध्ये अंतर्भाव करण्यात आलेला नाही. मात्र, ठराविक कालावधीनंतर उल्लेखित पेट्रोलियम वस्तू जीएसटी अंतर्गत आणण्याचे प्रयोजन संविधान संशोधनात करण्यात आले आहे व त्याबाबतचा निर्णय जीएसटी परिषद घेईल.

## २.७ इंटीग्रेटेड जीएसटी (IGST) कर पद्धती

जीएसटी हा Consumption Tax आहे. म्हणजेच ज्या राज्यामध्ये वस्तू किंवा सेवा यांचा उपभोग घेतला जाईल, तेथे कर जमा होईल. सध्या आंतरराज्य विक्री व्यवहारावर २% केंद्रीय विक्रीकराची आकारणी होते व सदर कर ज्या राज्यातून विक्री होते त्या राज्यास प्राप्त होतो. या पद्धतीमध्ये आंतरराज्य खरेदी करणाऱ्यास भरलेल्या केंद्रीय विक्रीकराचा परतावा मिळत नाही. त्यामुळे अप्रत्यक्ष कराची साखळी तुटते. जीएसटी अंतर्गत IGST कराची आकारणी केंद्र शासनामार्फत आंतरराज्य पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यांवर करण्यात येईल. मात्र आकारणी झालेल्या कराची पूर्ण वजावट वस्तू व सेवेची खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यास मिळणार आहे. IGST मुळे कराची पूर्ण वजावट मिळणार असल्याने आंतरराज्य विक्री व्यवहारांवर कराचा बोजा शून्य होईल. तसेच सध्या आयातीवर आकारले जाणारे सीव्हीडी (CVD) आणि एसएडी (SAD) हे कर जीएसटी कालावधीत लागणार नाहीत.

www.reliableacademy.com 9222333999

## २.८ जीएसटीचा ग्राहकांना फायदा

वस्तूंची किंमत अदा करताना वस्तूवरील कर हा किंमतीचा भाग असतो. कराचा भार जास्त असल्यास वस्तूची किंमत जास्त असते. अस्तित्वातील अप्रत्यक्ष करपद्धतीमुळे वस्तूच्या विक्री किंमतीवर आकारण्यात येणाऱ्या करावर कराची आकराणी होते. परंतु, जीएसटीमध्ये करावरील कराची आकारणी नसल्यामुळे तसेच खरेदीवरील कराची पूर्ण वजावट मिळाल्यामुळे वस्तूच्या विक्रीवरील कराचा भार कमी होईल. याचा परिणाम वस्तूच्या व सेवेच्या किंमतीवर होऊन किंमत कमी होईल.

## २.९ जीएसटीअंतर्गत व्यापाराला चालना

जीएसटी ही समान करप्रणाली लागू झाल्याने राज्यातील व्यापाराला, उद्योगाला चालना मिळेलच तसेच देशभरात एकच करप्रणाली अंगीकृत झाल्याने देशात एकसंघ बाजारपेठ निर्माण होईल. सद्य:परिस्थितीत प्रत्येक राज्यात अप्रत्यक्ष करप्रणालीची वेगवेगळी पद्धत असल्याने व्यापाराला प्रत्येक राज्यातील वेगवेगळी करप्रणाली समजून घेणेही अवघड जात आहे. परंतु, जीएसटीमुळे संपूर्ण देशात अप्रत्यक्ष कराची एकच पद्धत अंमलात येईल. देशात एकच (Common) बाजारपेठ निर्माण होईल. निर्यातदाराला त्याने निर्यातीसाठी वापरलेल्या सर्व खरेदीमालावर दिलेल्या कराचा परतावा मिळणार असल्याने तसेच निर्यातीवर कुठलीही कर आकारणी होणार नसल्याने (zero rating of export) आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याला आपल्या मालाची किंमत स्पर्धात्मक ठेवता येईल.

## ३. कर प्रशासनाशी किमान संवाद

वस्तू व सेवा कराखाली करदाता आणि कर वसूल करणारे प्राधिकारी यांच्यामध्ये प्रत्यक्ष संवाद किमान असेल. या संबंधीच्या काही महत्वाच्या तरतुदी खाली स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत.

(i) नोंदणी ऑनलाईन दिली जाईल आणि कर प्रशासनाकडून तीन कामकाजाच्या दिवसांत अर्जदारास अर्जातील कमतरता कळविली नाही तर अर्ज योग्य आहे असे समजून नोंदणी आपोआप दिली जाईल

(ii) करदाता स्वतःची निर्धारणा स्वतः करून देय कर शासनाच्या खात्यावर जमा करील

(iii) इंटरनेट बँकीगद्वारे इलेकट्रॉनिक माध्यमातून कराचा भरणा करता येईल. छोट्या करदात्यांना इलेकट्रॉनिक माध्यमातून तयार करण्यात आलेल्या चलनाद्वारे बँकेमध्ये जावून करभरणा करता येईल.

(iv) कर प्राधिकाऱ्याशी कोणताही प्रत्यक्ष संवाद न साधता, करदाता केलेल्या पुरवठ्याचा (outward supply) तपशील देवू शकेल. करदात्याकडे आलेल्या पुरवठ्याचा (inward supply) तपशील संबंधीत पुरवठादाराकडून दाखल करण्यात आलेल्या माहितीद्वारे तयार केला जाईल.

www.reliableacademy.com 9922333999

(v) करदाता जावक पुरवठ्याचा (Outward supply) तपशील, आवक पुरवठ्यांचे इनपुट क्रेडिट, भरलेला कर इत्यादी माहिती मासिक विवरणाद्वारा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दाखल करेल. आपसमेळाखालील (Composition) त्रैमासिक विवरणे ही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दाखल करेल. करदात्यास चुकून राहिलेला / अयोग्य तपशील स्वत: दुरूस्त करता येईल. पुढील वर्षाच्या सप्टेंबरचे विवरण दाखल करण्यापूर्वी किंवा वार्षिक विवरण दाखल करावयाची प्रत्यक्ष तारीख यापैकी जी आधी असेल, त्यापूर्वी विवरणात दुरूस्ती करता येईल.

(vi) कर प्राधिकार्याकडून मान्यता न घेता करदाता स्वत:च जीसटीएन पोर्टल वर इनपुट क्रेडिट जुळवून, प्रत्यावर्तन (Reversal) आणि पुन्हा दावा इलेक्ट्रॉनिकली करू शकेल. (यामुळे बनावट देयक किंवा त्याच देयकावर दोनदा इनपुट टॅक्स क्रेडिटचा दावा करावयाच्या गोष्टींना आळा बसेल) पुरवठादार बीजकांची संपूर्ण माहिती जीएसटीएन पोर्टलवर नमुना जीएसटीआर–१ मध्ये अपलोड करेल, प्राप्तकर्ता सुद्धा आपली खरेदीची माहिती नमुना जीएसटीआर – २ मध्ये अपलोड करेल. दोन्हीही माहितींची पडताळणी करुन न जुळणारी बीजकांची माहिती दोघांनाही कळविली जाईल.

(vii) करदात्यास लेखापुस्तके आणि इतर नोंदी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ठेवण्याची आणि जतन करण्याची परवानगी राहील.

## ४. जीएसटी (GST) अदा करण्याचे दायित्व

जीएसटी (GST) करप्रणाली अंतर्गत करपात्र व्यक्तीला वस्तूंचा पुरवठा आणि सेवापूर्ती यासाठी कर भरावा लागेल. जेव्हा करपात्र व्यक्ती, सीमित सूट मर्यादा (threshold limit) पार करते (म्हणजेच रु. २० लाख मर्यादा ओलांडते) तेव्हा त्या व्यक्तीवर कर भरण्याची जबाबदारी येते, शिवाय काही विशिष्ट निर्दिष्ट बाबींमध्ये करपात्र व्यक्तीने सीमित सूट मर्यादा पार केली नसली तरीही त्या व्यक्तीवर कर भरण्याची जबाबदारी येते. (कलम २४) राज्यांतर्गत झालेल्या सर्व वस्तू व सेवा यांच्या पुरवठा व्यवहारात CGST व SGST देय असणार आणि आंतर – राज्यांत झालेल्या सर्व वस्तू व सेवा यांच्या पुरवठा व्यवहारात IGST देय असणार. एकात्मिक वस्तू व सेवाकराचा (IGST) दर म्हणजेच राज्य वस्तू व सेवाकर (SGST) व केंद्रिय वस्तू व सेवा कर (CGST) यांच्या दराची बेरीज होय. CGST, SGST आणि IGST संबंधित अधिनियमांच्या परिशिष्टमध्ये विहीत केलेल्या दरांनुसार देय राहील.

## ५. जीएसटी (GST) करप्रणाली अंतर्गत लहान करदात्यांना प्राप्त होणारे लाभ

आर्थिक वर्षात रु. २० लाख पर्यंत एकूण उलाढाल असलेल्या करदात्यांना करातून सूट देण्यात येईल. एकूण उलाढालीत, सर्व करपात्र व करमुक्त पुरवठ्यांचे मूल्य, सूट दिलेल्या वस्तू किंवा सेवांच्या पुरवठ्यांचे मूल्य तसेच वस्तू व सेवा यांच्या निर्यातीचे मूल्य इत्यादींचा समावेश असेल.



www.reliableacademy.com 9922333999

परंतू, यात वस्तू व सेवा कराच्या मूल्याचा समावेश असणार नाही. अखिल भारतीय स्तरावर एकूण उलाढालीची गणना केली जाईल. संविधानाच्या अनुच्छेद २७९ अ च्या खंड ४ च्या उपखंड (छ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या ११ राज्यांच्या बाबतीत एकूण उलाढालीची सीमित सूट रु. १० लाख असेल. आंतर राज्य पुरवठ्यांचे व्यवहार करणारे किंवा रिव्हर्स चार्ज (Reverse charge) आधारावर कर अदा करणारे करदाते सीमित सूट मर्यादेसाठी (Threshold Exemption) पात्र नसतील.

## ६. प्रत्यावर्ती आकार (Reverse Charge)

प्रत्यावर्ती आकार (Reverse charge) म्हणजे वस्तू व सेवा किंवा दोन्ही पुरविणाऱ्या व्यक्ती ऐवजी वस्तू व सेवा प्राप्त करणाऱ्या व्यक्तीचे कर देण्याचे दायित्व. शासनास परिषदेच्या शिफारशींवरुन ज्या वस्तूंवर किंवा सेवांवर किंवा दोन्हीवर ग्राहकांकडून प्रत्यावर्ती भाराच्या आधारे (Reverse Charge) कर भरला जाईल अशा वस्तूंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या पुरवठ्याचे प्रवर्ग अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करता येतील आणि प्राप्तकर्ता जणू काही अशा वस्तूंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हींच्या पुरवठ्याच्या संबंधात कर भरण्यास पात्र असल्याप्रमाणे या अधिनियमाच्या सर्व तरतूदी त्यास लागू असतील.

## ७. जीएसटी (GST) परिषद

संविधानातील नवीन अनुच्छेद २७९ अ प्रमाणे जीएसटी परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. जीएसटी परिषद दिनांक १२ सप्टेंबर २०१६ पासून अस्तित्वात आली आहे. केंद्रीय अर्थमंत्री हे परिषदेचे अध्यक्ष आहेत. केंद्रीय अर्थराज्यमंत्री व प्रत्येक राज्याचे अर्थमंत्री हे परिषदेचे सदस्य आहेत. परिषदेचा कोरम एकूण सदस्यांच्या ५०% असेल. निर्णय हा उपस्थित सदस्यांच्या ७५% इतक्या बहुमताने घेतला जाईल. जीएसटीचा कायदा, नियम व कराचे दर तसेच खालील इतर बाबी यासंबंधीच्या शिफारशी जीएसटी परिषद करील.

(i) जीएसटी मध्ये समाविष्ट होणारे कर

(ii) जीएसटीतून सूट मिळालेल्या आणि जीएसटी लागू असलेल्या वस्तू व सेवा;

(iii) नोंदणीसाठी आवश्यक असलेली उलाढालीची मर्यादा

(iv) नैसर्गिक आपत्ती किंवा संकटकाळी अतिरिक्त संसाधनांसाठी ठराविक कालावधीसाठी विशेष दर ठरविणे; आणि ईशान्येकडील राज्ये, जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड यांच्या बाबतीत विशेष तरतुदी.

www.reliableacademy.com 9922333999


## ८. GSTN (Goods Services Tax Network) व जीएसटी सुविधा पुरवठादार -- जीएसपी (GSP)

वस्तू आणि सेवा कर नेटवर्क (GSTN) ही विना – नफा बिन-सरकारी कंपनी आहे. सदर कंपनी सामाईक माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा आणि सेवा, केंद्र आणि राज्य सरकार या दोघांसह करदाते आणि इतर आर्थिक हितसंबंधी व्यक्ती यांना उपलब्ध करुन देईल. GSTN सर्व करदात्यांसाठी नोंदणी, विवरण आणि करभरणा इत्यादी सेवा उपलब्ध करुन देईल. सरकार आणि करदाते यांमध्ये संपर्क/संवाद साधण्याचे कार्य जीएसटीएन (GSTN) करील.

जीएसपी (GSP) म्हणजेच जीएसटी सुविधा पुरवठेदार. जीएसपी (GSP) करदात्यांना आणि इतर आर्थिक संबंधी व्यक्ती यांना जीएसटी प्रणालीशी जोडण्यासाठी नाविन्यपूर्ण आणि सोयीस्कर पद्धती उपलब्ध करुन देतील. जीएसपी द्वारा उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कर लेखांकनसंगणक प्रणालीचा फायदा म्हणजे करदात्याला व्यापक प्रमाणात जास्तीत जास्त कर आकारणी कार्यक्षमता अगोदरच उपलब्ध करुन देणे असे आहे. जीएसटीएन ने सध्या ३४ सुविधा पुरवठेदार यांची निवड केली आहे.

GSTN व GSP यांची कार्यपद्धती व कार्यप्रणाली पुढील आकृती क्रमांक ३, ४ व ५ मध्ये दर्शविण्यात आली आहे.


**आकृती क्र. ३** जीएसटी माहिती तंत्रज्ञान नीति




www.reliableacademy.com 9922333999


आकृती क्र. ४

## जीएसटी माहिती तंत्रज्ञान नीति




आकृती क्र. ५

## जीएसटी सुविधा प्रबंधक (जीएसपी)






www.reliableacademy.com 9822233999

## ९. जीएसटीचे (GST) नियम

जीएसटी परिषदेने आतापर्यंत खालील ९ जीएसटी (GST) संबंधी नियमांना मान्यता दिलेली आहे.

(i) नोंदणीचे नियम

(ii) विवरणाचे नियम

(iii) कर भरण्याचे नियम

(iv) मूल्यांकनाचे नियम

(v) बीजकांचे नियम

(vi) निविष्ट कराची जमा (ITC) चे नियम

(vii) आपसमेळ योजनेचे नियम

(viii) संक्रमणकालीन नियम

खालील नियमांचे प्रारुप तयार करण्याचे काम चालू आहे.

(i) आगाऊ अधिनिर्णय (Advance Ruling) नियम

(ii) करनिर्धारणा आणि लेखापरिक्षण नियम

(iii) ई–परवाना नियम

(iv) मागणी आणि वसूली नियम

(v) लेखे व अभिलेखे नियम

(vi) अपिल व पुनरिक्षण नियम

(vii) तपासणी, जप्ती व अटक नियम

(viii) अपराध, शास्ती व अपराध मिटवणे नियम

(ix) संकिर्ण नियम (Miscellaneous Rules)

हे सर्व नियम लवकरात लवकर सार्वजनिक करण्यात येतील.

## १०. एक करदाता एक कर प्रशासन

एक करदाता एक कर प्रशासन :– राज्य किंवा केंद्र हे सूत्र स्वीकारण्यात आले आहे. जीएसटी परिषदेने करदात्यांचे केंद्र व राज्यांमध्ये वाटपाचे अंतिम रुप तयार केले असून त्याचे सूत्र पुढीलप्रमाणे आहे.

www.reliableacademy.com 9222333999

(i) रु. १.५० कोटी खालील उलाढाल असलेले ९०% करदाते राज्य कर प्रशासनाकडे राहतील

(ii) रु. १.५० कोटीखाली उलाढाल असलेले १०% करदाते केंद्र कर प्रशासनाकडे राहतील

(iii) रु. १.५० कोटी पेक्षा जास्त उलाढाल असलेल्या करदात्यांची समान विभागणी केंद्र कर प्रशासनाकडे व राज्य कर प्रशासनाकडे असेल

## ११. कर दर संरचना

जीएसटी (GST) परिषदेमध्ये झालेल्या ठरावाप्रमाणे कर दर संरचना आकृती क्र. ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे राहील.

**आकृती क्र. ६** **कर दर संरचना**

| प्रकार | कराचा दर | वस्तू व सेवा प्रकार |
|---|---|---|
| शून्याधारित | ०% | जीवानवश्यक वस्तू (अन्नधान्यासह) |
| निम्नदर | ५% | सर्वसाधारणपणे वापरात असणाऱ्या वस्तू व सेवा |
| दोन प्रमाण दर | १२%<br>१८% | ग्राहकोपयोगी वस्तू व<br>सेवा (मोठ्या प्रमाणात समावेश) |
| उच्चतम दर | २८% | लक्झरी मोटार, तंबाखू उत्पादने व शीतपेये |
| अतिरिक्त सेस | – | लक्झरी मोटार, तंबाखू उत्पादने, शीतपेये व इतर |

## १२. ई–वे बिल (e-way Bill)

पन्नास हजार किंवा त्यापेक्षा जास्त किंमतीच्या मालाची वाहतूक करण्यासाठी ई–वे बिल आवश्यक राहील. ई–वे बिलाची निर्मिती संगणकीय प्रणाली (GSTN) मार्फत पोर्टलद्वारे होणार आहे. पुरवठादार, वस्तू किंवा सेवा प्राप्त करणारा तसेच वाहतुकदार यांना ई–वे बिल क्रमांक उपलब्ध होईल. हा ई–वे बिल क्रमांक सर्व संबंधितांना ई–मेल व एसएमएस द्वारे पुरविला जाईल. वाहतूक करणाऱ्या व्यक्तीस ई–वे बिल किंवा ई–वे बिलचा क्रमांक बाळगणे आवश्यक असेल. सदर ई–वे बिलचा क्रमांक ध्वनी लहरी उपकरणाव्दारे (RFID) ओळखण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास उपरोक्त बाबी तपासण्याचे अधिकार राहतील.

www.reliableacademy.com 9222333999

## १३. जीएसटी सल्लागार (GST Practitioner)

केंद्र अथवा राज्य शासन एखाद्या पात्र व्यक्तीस जीएसटी सल्लागार म्हणून मान्यता देईल. असा जीएसटी सल्लागार करपात्र व्यक्तीच्या वतीने जीएसटी संबंधीची कायदा व नियमानी नेमून दिलेली कामे करेल. सल्लागार होण्यासाठी कायद्यामध्ये दिलेल्या विविध पात्रता व अटी पूर्ण करावयास लागतील.

## १४. जीएसटीच्या तयारीत महाराष्ट्राचे योगदान

गेल्या काही वर्षांपासून होणाऱ्या शक्तीप्रदत्त समितीच्या बैठकांमध्ये महाराष्ट्राने नेहमीच उत्तम कामगिरी बजावली आहे. सप्टेंबर २०१६ मध्ये जीएसटी परिषद अस्तित्वात आल्यापासून जीएसटी संबंधीच्या कामांना विशेष गती प्राप्त झाली आहे. महाराष्ट्राच्या योगदानाचे ठळक मुद्दे –

(i) जीएसटी परिषदेमध्ये क्लिष्ट विषयांवर तोडगा काढण्यात महाराष्ट्राच्या मा. वित्त मंत्र्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे.

(ii) शक्ती प्रदत्त समितीच्या उपसमितीचा सदस्य म्हणून महाराष्ट्राने जीएसटी संबंधी विविध विषयावर महत्वपुर्ण योगदान दिले आहे.

(iii) घटना दुरुस्ती तसेच जीएसटीचे कायदे – नियम तयार करणाऱ्या समित्यांमध्ये महाराष्ट्राचा सहभाग आहे.

(iv) जीएसटीसाठी लागणाऱ्या संगणकीकरणाच्या तयारीमध्ये महाराष्ट्राची योग्य दिशेने वाटचाल चालू आहे.

(v) महाराष्ट्राने भारत सरकारच्या सहकार्याने पश्चिम क्षेत्रातील सहा राज्यांमधील उद्योग, व्यापारी प्रतिनिधींसाठी तसेच अधिकाऱ्यांसाठी (वस्तू व सेवा कराविषयी अवगत करुन देण्यासाठी) स्वतंत्र कार्यशाळा आयोजित केल्या.

(vi) खात्याने आतापर्यंत ५१०० अधिकारी– कर्मचाऱ्यांना जीएसटी कायद्याचे प्रशिक्षण दिले आहे. यात १७ मुख्य प्रशिक्षकांचा आणि १०० प्रशिक्षकांचा समावेश आहे.

(vii) १७५ अधिकाऱ्याना जीएसटीएनचे मुख्य प्रशिक्षक म्हणून प्रशिक्षण दिले आहे

(viii) आणखी ६००० राज्य अधिकारी – कर्मचाऱ्यांना जीएसटीएन चे प्रशिक्षण देणे प्रगतीपथावर आहे

(ix) महाराष्ट्रामध्ये सर्वदूर २४० GST जनजागृती चे कार्यक्रम राबविले जात आहेत. त्यात मुंबईतील ३३ कार्यक्रमांचा सहभाग आहे.

www.reliableacademy.com 9922333999

## १५. जीएसटी (GST) अधिनियमातील ठळक वैशिष्टे खालीलप्रमाणे–

वस्तू व सेवा कर संबंधी केंद्रीय वस्तू व सेवा विधेयक तसेच एकात्मिक वस्तू व सेवा कर विधेयक संसदेने पारीत केले आहेत. जीएसटी परिषदेने राज्य वस्तू व सेवा कर कायद्याच्या प्रारुपाला मान्यता दिली आहे. सदर प्रारुपास केंद्र सरकारच्या न्याय व विधी विभागानेही मान्यता दिली आहे. राज्य शासनाने या प्रारुपाप्रमाणे विधेयक तयार केले आहे. सदर विधेयक येणाऱ्या विशेष अधिवेशनात विधिमंडळासमोर सादर केले जाईल.

जीएसटी अधिनियमातील ठळक वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

(i) जीएसटी अधिनियमात एकवीस प्रकरणे व एकशे चौऱ्याहत्तर कलम व ३ परिशिष्टांचा समावेश आहे.

(ii) जीएसटी कायदयाची अंमलबजावणी राज्य शासनामार्फत नेमून दिलेल्या अधिकाऱ्यामार्फत केली जाणार असून, त्यामध्ये केंद्र शासनाद्वारे सीजीएसटी कायदयाअंतर्गत अंमलबजावणी करण्याचा अधिकार प्राप्त झालेल्या अधिकाऱ्यांना राज्य शासन ठरवेल त्या अटीच्या अधिन राहून अंमलबजावणीचे अधिकार देण्यात येतील.

(iii) मद्याची विक्री वगळता राज्यांतर्गत वस्तू व सेवा वा दोन्हींच्या होणाऱ्या पुरवठ्यावर राज्य शासनामार्फत अधिसूचीत दराने कराची आकारणी होईल. एसजीएसटी (SGST) कराचा दर परिषदेने शिफारस केल्याप्रमाणे परंतू २०% पेक्षा अधिक असणार नाही.

(iv) कच्चे तेल, पेट्रोल, डिझेल, नैसर्गिक वायू तसेच विमानाचे इंधन यावर परिषदेने शिफारस केल्याच्या दिनांकानंतरच जीएसटी कराची आकारणी करण्यात येईल. सध्या ह्या पाच वस्तू जीएसटी (GST) कायद्याच्या कक्षेबाहेर ठेवण्यात आल्या आहेत.

(v) पुरवठा या संज्ञेची व्याख्या सर्वंकष करण्यात आली असून, त्यामध्ये व्यवसायाकरिताची तसेच त्याच्या अभिवृद्धी करिता आवश्यक असलेल्या, मोबदला असेल किंवा नसेल अशा पुरवठ्यावर कराची आकारणी अभिप्रेत आहे.

(vi) शासनास ठराविक पुरवठ्याबद्दल तो वस्तू वा सेवेचा पुरवठा आहे किंवा नाही हे अधिसूचीत करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. परंतू हा अधिकार जीएसटी परिषदेच्या शिफारशीनुसार वापरता येईल.

(vii) विवक्षित पुरवठ्यावर पुरवठादाराऐवजी प्राप्तकर्त्यावर कराची आकारणी करण्याचे प्रावधान करण्यात आले आहे.

www.reliableacademy.com 9422333999

(viii) परिषदेने शिफारस केल्याप्रमाणे केंद्र शासनाने केंद्रीय वस्तू व सेवा कर कायद्याअंतर्गत अधिसूचना वा आदेशाद्वारे कराची माफी दिल्यास ती राज्य शासनास बंधनकारक असेल.

(ix) राज्यामध्ये वस्तू व सेवांचा व्यवहार करणाऱ्या व्यक्तीस नोंदणी घेणे व त्यावर कराचा भरणा करणे आवश्यक असेल.

(x) राज्यामध्ये व्यक्तीच्या व्यवसायाची उलाढाल आर्थिक वर्षामध्ये रु. २० लाखापेक्षा अधिक झाल्यास त्यास नोंदणी घेणे अनिवार्य असेल. उलाढालीची मर्यादा २० लाखांपेक्षाही कमी असेल तरीही व्यक्ती ऐच्छीक नोंदणी घेवू शकेल. तसेच काही ठराविक व्यक्तींना नोंदणीकरिता उलाढालीची मर्यादा असणार नाही. विहित कालावधीमध्ये नोंदणी देणे व नोंदणी रद्द करण्याचे प्रावधानही करण्यात आले आहे.

(xi) रु. ५० लाखापेक्षा कमी उलाढाल असलेल्या छोट्या करदात्यांकरिता आपसमेळ (composition) योजनेचे प्रावधान करण्यात आले आहे, मात्र या योजनेअंतर्गत हॉटेल व्यावसायिक वगळता इतर सर्व सेवा पुरवठादार तसेच आंतरराज्य विक्री करणारे करदाते यांना लाभ घेता येणार नाही. योजनेअंतर्गत करदाते त्यांना देय कराऐवजी अधिसूचीत दराने कराचा भरणा करु शकतील. आपसमेळ करदात्यास ग्राहकाकडून कुठलाही कर गोळा करता येणार नाही. तसेच आपसमेळ योजना ही ऐच्छिक असेल

आपसमेळ योजनेसाठी जीएसटी परिषदेने खालील आकृती क्र. ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे कमाल दराची शिफारस केलेली आहे

**आकृती क्र. ७** **आपसमेळ योजनेसाठी कराचा दर**

| अनु. क्र. | पुरवठादार | राज्य कराचा दर | एकूण जीएसटीचा दर |
|---|---|---|---|
| १ | उपहारगृहे इ. | २.५% | ५% |
| २ | उत्पादक | १% | २% |
| ३ | इतर पुरवठादार | ०.५% | १% |

(xii) सर्वसाधारणपणे पुरवठा करण्यात आलेल्या वस्तू व सेवेच्या किंमतीवर कराची आकारणी करण्यात येईल. ज्या पुरवठा व्यवहाराबाबत किंमत उपलब्ध नसेल

join us on telegram at @mpscofficers

किंवा त्यावर विश्वास ठेवता येणार नाही त्या व्यवहाराबाबतची किंमत त्याबाबत असलेल्या नियमाच्या आधारे ठरविण्यात येईल.


(xiii) कराची देयता, सर्वसाधारणपणे पुरवठ्याबाबत देण्यात आलेल्या बीजकाचा दिनांक किंवा बीजक देण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या शेवटचा दिनांक वा किंमत अदा केलेला दिनांक या पैकी जे अगोदर असेल त्या दिनांकास निश्चित करण्यात आली आहे.

(xiv) करदात्याने त्याच्या व्यवसायाच्या वा त्याच्या पुन:निरसाबाबत केलेल्या खरेदी संदर्भात पुरवठा व्यवहारावर दिलेल्या कराची वजावट मिळेल. मात्र काही ठराविक वस्तू वा सेवांबाबत कराची वजावट न देण्याचे प्रावधान करण्यात आले आहे.

(xv) करदात्याला त्याच्या पुरवठा व्यवहाराबद्दल ई–विवरणपत्र प्रमाणे दाखल करणे आवश्यक असेल. विवरणपत्रासमवेत बीजकनिहाय दाखल झालेल्या परिशिष्टानुसार करदात्यास खरेदीवरील कराची वजावट देय असेल.

**आकृती क्र. ८** **कायद्याची ठळक वैशिष्ट्ये**

**विवरण दाखल करण्याची पद्धत**




www.reliableacademy.com 9222833999

विवरणपत्राप्रमाणे कराचा भरणा न केलेल्या तसेच बीजकाची मेळजुळणी न झालेल्या व्यवहाराबद्दल कराची वजावट मिळणार नाही. विवरण दाखल करण्याची पद्धत आकृती क्र. ८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे असेल

(xvi) करदात्यास कराचा भरणा करण्याकरिता विविध पर्याय म्हणजेच इंटरनेट बँकींग, डेबीट/क्रेडीट कार्ड, National Electronic Fund Transfer (NEFT)/ Real Time Gross Settlement (RTGS) उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. कराचा भरणा विवरणपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यंत करणे अनिवार्य असेल. करदात्याने भरणा केलेल्या रकमेकरिता Electronic Cash Ledger उपलब्ध करण्यात आले आहे. उशीरा कर भरण्यावर परिषदेने शिफारस केलेल्या दराप्रमाणे व्याजाची आकारणी करण्यात येईल.

(xvii) शासकीय विभाग, स्थानिक संस्था तसेच शासकीय संस्थांना होणाऱ्या रु. २.५ लक्ष पेक्षा जास्त पुरवठ्याच्या देय रकमेवर १% कराच्या दराने कराची वजात (TDS) करण्याचे प्रावधान करण्यात आले आहे. करवजात करणाऱ्या संस्थेने विवरणपत्र दाखल करणे आवश्यक असून करवजातीचा भरणा विलंबाने करणाऱ्यास व्याजाची आकारणी करण्यात येईल.

(xviii) निर्यातदारास त्याने दावा केलेल्या देय परताव्यापैकी ९० टक्के रक्कम तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येईल.

(xix) परतावा देण्यास साठ दिवसांपेक्षा अधिक विलंब झाल्यास परिषदेने शिफारस केलेल्या दराप्रमाणे करदात्यास व्याज दिले जाईल.

(xx) ई–व्यवहार पोर्टलवर (e-commerce portal) व्यवहार करणाऱ्या पुरवठादारांना दिल्या जाणाऱ्या मोबदल्याच्या किंमतीतून १ टक्क्यापेक्षा अधिक नसलेल्या रकमेच्या कराची कपात करणे ई–पोर्टलला आवश्यक असेल. हे प्रावधान जे ई–पोर्टल, पुरवठादाराच्या वतीने किंमत वसूल करतात त्यांना लागू असेल.

(xxi) वार्षिक विवरणपत्र दाखल केल्यानंतर ७२ महिन्यांपर्यंत करदात्यास त्यासंदर्भातील हिशोबाची पुस्तके जतन करणे आवश्यक असेल. विहित केलेल्या उलाढालीच्या मर्यादेनंतर करदात्यास त्याचे हिशेब तपासणी करुन त्याबाबतची प्रत व मेळजुळणी विवरण दाखल करणे आवश्यक असेल.

(xxii) करदात्याने करदेयतेबाबत स्वत: निर्धारणा करणे अभिप्रेत आहे. त्याचप्रमाणे करदेयतेबाबत तपासणीकरिता Best Judgment, Summary तसेच तात्पुरती (provisional) निर्धारणाही करता येवू शकेल.



www.reliableacademy.com 9222353999

(xxiii) करदात्याने अधिनियमातील प्रावधानानुसार करभरणा केला आहे की नाही याचे लेखा परीक्षण करता येईल. लेखा परीक्षण करण्याबाबत करदात्यास आगाऊ सुचना देण्यात येईल व ही लेखा परीक्षणाची प्रक्रिया जास्तीत जास्त नऊ महिन्यांच्या आत पूर्ण करण्यात येईल. तसेच आयुक्तांच्या पूर्वपरवानगीने सनदी लेखापालांद्वारे करदात्याचे लेखा परीक्षण केले जावू शकेल.

(xxiv) सर्वसाधारण प्रकरणामध्ये करदात्याने विवरणपत्रासमवेत कराचा पूर्ण भरणा केला नसल्यास किंवा आदेशाप्रमाणे कराचा भरणा केला नसल्यास वा चुकीच्या पद्धतीने परतावा दिला गेला असल्यास, वार्षिक विवरणपत्र भरावयाच्या शेवटच्या दिनांकापासून तीन वर्षांपर्यंत मागणी आदेश देता येवू शकेल.

(xxv) कराची चोरी वा खोटी विवरणपत्रे दाखल झालेल्या प्रकरणांमध्ये वार्षिक विवरणपत्र भरावयाच्या शेवटच्या दिनांकापासून पाच वर्षांपर्यंत मागणी आदेश देता येवू शकेल.

(xxvi) विवरणपत्रानुसार देय कराचा भरणा न केल्यास त्या कर रकमेबाबत व अनुषंगिक व्याजाबाबत मागणी आदेश देण्याची आवश्यकता असणार नाही असे स्पष्ट प्रावधान करण्यात आले आहे.

(xxvii) वेगवेगळ्या स्तरावर विविध प्रमाणात शास्ती लावण्याचे प्रावधानही करण्यात आले आहे. सर्वसाधारणपणे आदेशामध्ये दर्शविल्याप्रमाणे कराचा व त्यावरील व्याजाचा भरणा मागणी आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांत करण्यात आला असेल तर त्यावर शास्तीची आकारणी होणार नाही. कराची चोरी वा खोटया विवरणपत्राच्या प्रकरणामध्ये शास्तीची रक्कम अधिकच्या कराच्या रकमेइतकी असेल. कपट फसवणूक प्रकरणांमध्ये मागणी आदेशाच्या अगोदर देय कर व व्याजाचा भरणा केल्यास १५ टक्क्यांपर्यंत शास्तीची आकारणी होईल, तर मागणी आदेशानंतर तीस दिवसांत कर व व्याजाचा भरणा केल्यास २५ टक्क्यांपर्यंत शास्तीची आकारणी होईल व कर व व्याजाचा भरणा आदेशानंतर तीस दिवसांत झाल्यास ५० टक्क्यांपर्यंत शास्तीची आकारणी होईल.

(xxviii) पुरवठा करपात्र असेल किंवा नसेल तरीही करापोटी जमा केलेल्या रकमेचा भरणा शासकीय तिजोरीत करावा लागेल.

(xxix) कराच्या थकबाकीची वसूली करदात्याच्या चल व अचल मालमत्तेच्या विक्रीतून करता येवू शकेल. कराच्या थकबाकीबाबत करदात्यांस चोवीस हप्ते सवलत देता येवू शकेल. करदात्याच्या अचल मालमत्तेस कराची मागणी येण्याची शक्यता असल्यास तात्पुरत्या स्वरुपात जप्ती आणता येवू शकेल. तसेच कायद्याअंतर्गत थकबाकी बाबतीत Bankruptcy and Insolvency Code, २०१६ च्या अधिन राहून करकसूरदाराच्या मालमत्तेवर प्रथम भार असेल.



www.reliableacademy.com 9822253999

(xxx) सहआयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्याच्या परवानगीने ज्या प्रकरणांमध्ये करचोरीची शक्यता लक्षात येईल त्या करदात्याच्या धंद्याच्या ठिकाणी वा हिशोबाची पुस्तके ठेवली जातात त्या ठिकाणी तपासणी व झडती घेता येवू शकेल.

(xxxi) मालाची वाहतूक करणाऱ्या व्यक्तीने विहित केलेल्या मालाच्या मूल्यावरील वाहतूक करताना काही कागदपत्रे बाळगणे आवश्यक असेल व ते तपासण्याचे अधिकार कर अधिकाऱ्यास देण्यात आले आहेत.

(xxxii) विहित केलेल्या कराच्या रकमेची चोरी करणाऱ्या व्यापाऱ्यास अटक करण्याचे अधिकार देण्यात आले असून, ते अधिकार फक्त आयुक्त दर्जाचे अधिकारी वापरु शकतील.

(xxxiii) अन्वेषणादरम्यान व्यक्तीच्या तपासणीची आवश्यकता असल्यास त्याची उपस्थिती अनिवार्य करता येईल. तसेच त्याने अन्वेषणाबाबत कागदपत्रे दाखल करणेही अनिवार्य करण्यात आले आहे.

(xxxiv) आगाऊ अधिनिर्णय (Advance Ruling) देण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे.

(xxxv) संक्रमणकालीन प्रश्नांची सोडवणूक व्हावी यासाठी परिपूर्ण व सर्वसमावेशक व्यवस्था (कलम १३९ ते कलम १४२) करण्यात आली आहे.


(xxxvi) जॉब वर्क करणाऱ्यांच्या हिताची काळजी घेण्यासाठी परिपूर्ण सोय करण्यात आली आहे.

(xxxvii) करदात्यांच्या कायद्याच्या अनुपालनाबाबत गुणांकन पद्धतीची सोय करण्यात आली आहे.

www.reliableacademy.com 9222333999

https://t.me/mpscofficers

## जीएसटी अंतर्गत सेवांच्या किंमतीत होणारा परिणाम




## जीएसटी अंतर्गत वस्तूंच्या किंमतीत होणारा परिणाम




www.reliableacademy.com 9222333999

join us on telegram at @mpscofficers

https://t.me/mpscofficers

www.reliableacademy.com 9222333999

खालील सामुग्री **www.mahavat.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे

१. वस्तू व सेवा कराबद्दल सादरीकरण

२. वस्तू व सेवा कर:- एक दृष्टीक्षेप

३. वस्तू व सेवा करा बाबत वारंवार विचारले जाणारे प्रश्न

४. वस्तू व सेवा कर कायदे

५. प्रारुप वस्तू व सेवा कर नियम

६. घटना दुरुस्ती कायदा

# विक्रीकर विभाग, महाराष्ट्र शासन

join us on telegram at @mpscofficers